पेपर क्र. १४

Topic

Page No.

Date

॥ नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

# छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाचे.

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज.

ता. खटाव. जि. सातारा.

ARTS & COMMERCE COLLEGE
Tal. Khatav
Dist. Satara
(M.S.)

SH 17-2

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्त

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज

ता. खटाव जि. सातारा



# इतिहास विभाग

## विद्यार्थी यादी रोलनंबर

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | रोल नं. | सही. |
|---|---|---|---|
| 1) | कु. पवार अंकिता चंद्रकांत | 579. | [signature] |
| 2) | कु. पवार प्रियांका अशोक | 580 | P.A. Pawar |
| 3) | कु. पवार पल्लवी हणमंतराव | 581 | P.H. Pawar |
| 4) | कु. पुकळे सुरज वसंत | 582 | [signature] |
| 5) | कु. राऊत पुजा गणेश | 583 | Raut P.G |
| 6) | कु. साठे अश्विनी बाळू | 584. | Sathe A.B. |

### पर्यवेक्षक

प्रा. घार्गे आर.एम. व गुजर व्हि.बी.

### अधिव्याख्याता

कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

सन २०१७-१८

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

| अ.नु | विषयसुची |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | ~~उद्दिष्टे~~ प्रणानिर्देश. |
| ३ | जागतिकीकरणाचे फायदे व नोटे. |
| ४ | आभार |

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरण | पान नं. |
|---|---|---|
| 1] | ऋणनिर्देश | 01 |
| 2] | जागतिकीकरण प्रस्तावना | 02 |
| 3] | जागतिकीकरण संकल्पना | 03 |
| 4] | जागतिकीकरण व्याख्या | 04 |
| 5] | जागतिकीकरण फायदे | 06 |
| 6] | जागतिकीकरण तोटे | 09 |
| 7] | आभार | 12. |


Scanned with CamScanner

①

# ऋणनिर्देश.

आम्ही आपल्या कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज येथे B.A. भाग III (इतिहास विभाग) सन-२०१७-१८ या वर्गात शिकत असून इतिहास विषया अंतर्गत असलेले **जागतिकीकरण, त्याचे फायदे व तोटे** हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करत असताना आम्हाला आमच्या विषय शिक्षक प्रा. आर. एम. घार्गे व प्रा. व्ही. बी गुजर यांनी योग्य मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य डॉ. एल. जी जाधव यांनी देखील बहुमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल गट क्र. १ ची गटप्रमुख या नात्याने आमच्या गटातील सर्व विद्यार्थ्यांच्यामार्फत मी कुमारी पवार पल्लवी हणमंतराव, आपणा सर्वांचे मनापासून आभार मानते, तसेच आम्ही सर्वजण त्यांचे ऋणी आहोत.

**धन्यवाद.**

Scanned with CamScanner

BAL GANESH



②

# जागतिकीकरण

## Globalization.

## प्रस्तावना ~

जगातील सर्व देशामध्ये साधारण 1985 नंतर जागतिकिकरणाची संकल्पना महत्वाची मानली जाऊ लागली. सन 1980 च्या दशकात जगामध्ये जी उलथापालथ झाली. त्याच्या परिणाम तिसऱ्या जगातील म्हणजेच अविकसित व विकसनशील देशानी जागतिकीकरण स्वीकारले. याचाच एक भाग म्हणून भारतानेही सन 1991 ला जागतिकिकरणाचा स्विकार केला.

कै. आचार्य विनोबा भावे यांचे 'जय जगत' हे केवळ स्वप्न राहिले नसून ते प्रत्यक्षात येत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युनो, गॅट, नाणेनिधी, जागतिक बँक इ. जागतिक संघटना स्थापन झाल्या. या सर्वांचा उद्देश जगातील विविध देशांनी कोणत्याही अडथळ्याविना विविध प्रकारचे व्यवहार एकमेकांत करावेत. या जागतिक संघटनांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु केली. जागतिकिकरणाचा परिणाम कमी अधिक प्रमाणात देशांवर होत आहेत. यामुळे जागतिकीकरण हे आजच्या युगात महत्वाचे बनले आहे.



BAL GANESH

Champ's IKON Symbol of Scholars

Scanned with CamScanner

BAL GANESH



# जागतिकीकरणाची संकल्पना

## Concept Of Globalization.


जागतिकीकरणाचा अर्थ प्रत्येकजण आपल्याला जसा भावेल तसा घेत असतो. जागतिकीकरण मुख्यता आर्थिक स्थितीशी निगडीत आहे. त्याचे वेगवेगळ्या क्षेत्रांवर अप्रत्यक्षपणे परिणाम होतात. त्यानुसार सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रावर जागतिकीकरणातील अर्थव्यवस्थेच्या प्रक्रियामुळे विविध बदल घडतात. जागतिकीकरण कोणत्याही एका क्षेत्रापासून अलग करून त्याचा अर्थ लावता येत नाही.

बाजाराधिष्ठीत आर्थिक व्यवहारास उत्तेजन, जलद दळणवळणाच्या सोयी, माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसार यामुळे जगाच्या ~~सोयी~~ जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात कोणतीही वस्तू किंवा सेवा उत्पादन करणे. त्यातूनच जागतिकीकरणाची संकल्पना विकसित झाली. जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे. की जी आज जगभरच्या बहुतेक सर्व देशात पहावयास मिळते आहे.

अनेक जागतिकीकरणाचा अर्थ वेगवेगळा वाटतो. तथापि, या शब्दाच्या सोप्या भाषेत असा अर्थ आहे. की, 'जागतिकीकरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहाराचा विस्तार करणे होय.' म्हणजेच जागतिकीकरण ही आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया आहे.



BAL GANESH
Champ's IKON
Symbol of Scholars
Scanned with CamScanner



# व्याख्या -

## १] जागतिक बँकेने केलेली व्याख्या -

जागतिकीकरण म्हणजे (अ) उपभोग्य वस्तूंच्या समावेशासह सर्व वस्तूवरील आयात नियंत्रणे रद्द करणे. (ब) आयात जकातीचे दर कमी करणे (क) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खाजगीकरण करणे.

## २] माल्कम ॲडिसेशिह -

जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी जागतिक दृष्टीकोन निर्माण करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

## ३] चार्लस हिल -



जागतिकीकरण म्हणजे अधिक एकात्मता आणि परस्परावलंबन या दिशेने जागतिक अर्थव्यवस्थेत झालेला बदल होय.

अशा प्रकारे जागतिकीकरणाची व्याख्या दिली आहे.

Scanned with CamScanner

5

1] Presentation Functions

1] Text Direction
2] Line Layout.
3] Fonts
4] Dialogs.

2] MRI and Hardcopy

1] Totonals
2] Help
3] Messages.

# Globalization

3] Availability.

1] Education
2] Shaping
3] Sarvice
4] Support.

4] Hardware Suppert.

1] keyboards
2] printero
3] cantroliers.

BAL GANESH
BAL GANESH
Champ's IKON Symbol of Scholars

Scanned with CamScanner



# जागतिकीकरणाचे फायदे-

## Merits Of GlobaliZation-

सध्या जगातील अनेक देशांनी जागतिकीकरणाच्या धोरणाच्या विस्तृत प्रमाणावर स्वीकार केला आहे. सन 1991 मध्ये भारतनेही जागतिकिकरणाच्या स्वीकार केला आहे. भारतासारख्या विकसनशील देशास जागतिकीकरण फारच फायदेशीर आहे. या जागतिकीकरणाचे प्रमुख फायदे पुढीलप्रमाणे आहेत.

### 1] विदेशी भांडवलाच्या गुंतवणूकीला विस्तृत वाव-



जागतिकीकरणाच्या धोरणाने अंतर्गत भांडवलाच्या प्रवाहावर असलेली नियंत्रणे दूर केली जातात. त्यामुळे देशात विदेशी भांडवल मुक्तपणे येते आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये गरजेनुसार या भांडवलाची गुंतवणूक करता येते. भांडवलाची कमतरता ही विकसनशील देशापुढील महत्वाची समस्या असते.

Scanned with CamScanner



## ३] नवीन तंत्रज्ञानाची उपलब्धता -

आधुनिक काळात उद्योगामध्ये उपयोगात आणल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाच्या दर्जा ही आर्थिक विकासाची प्रक्रिया प्रभावित करणारी सर्वात महत्त्वाची बाब आहे. औद्योगिक संरक्षणवादाच्या एक भाग म्हणून विदेशी तंत्रज्ञानाच्या मुक्त आयातीवर व त्याच्या अनिर्बंध उपयोगावर निर्बंध असतात. पण जागतिकीकरणामुळे हे निर्बंध उठविण्यात आल्याने प्रगत व विकसनशील राष्ट्रांकडे असलेले विविध क्षेत्रातील नवनवे तंत्रज्ञान विकसनशील देशांकडे येणे शक्य झाले.

## ४] जलद औद्योगिक विकास -

जागतिकीकरणाच्या धोरणाने विदेशी भांडवलाची गुंतवणूक / आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता, कच्चा माल व इतर सामुग्रीची सहज उपलब्धता अशा विविध कारणांमुळे विकसनशील देशाच्या जलद गतीने औद्योगिक विकास घडून येतो.

## ५] बाजारपेठांचा विस्तार -



जागतिकीकरणाच्या धोरणाने आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रात प्रामुख्याने वस्तू व सेवांच्या आयात व निर्यातीवरील निर्बंध दूर केले जातात. त्यामुळे बाजारपेठांमध्ये कोणत्याही देशाच्या कोणत्याही वस्तूची खरेदी-विक्री करतात.

Scanned with CamScanner



## 5] आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धी -

जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापार वाढतो. कारण देशोदेशीच्या ग्राहकांची संख्या वाढते. त्यांच्या गरजाही वैविध्यपूर्ण असतात. अशा ग्राहकांना त्यांच्या गरजांनुसार कोठूनही माल मागविता येतो. व अन्य देशांना तशा प्रकारच्या मालाला पुरवठा करता येतो व अन्य देशांना तशा प्रकारच्या पुरवठा होतो.

## 6] रोजगाराच्या संधींची उपलब्धता -

जागतिकीकरणाचे धोरण राबविण्यात आल्यामुळे विकसनशील देशांमध्ये कारखानदारी व सेवा क्षेत्राचा 'विकास' घडून आल्याने नवे उद्योग, नवे व्यवसाय नव्या सेवा इत्यादींमुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. विशेषत: विकसनशील देशांत जागतिकीकरणामुळे बरेच बदल घडून येण्याची शक्यता असल्याने त्या अनुषंगाने अशा देशात तुलनेने कमी वेतनावर भरपूर रोजगार निर्माण झाल्याने आर्थिक विकासही होत असतो.



वरील वेगवेगळ्या जागतिकीकरणाचे फायदे सांगितले जातात. जागतिकीकरणाच्या फायद्यांचा विचार करता सैद्धांतिक पातळीवर प्रचारकी पद्धतीने सांगितले जाणारे फायदे व प्रत्यक्षातील अनुभव यात मध्यंतर असलेले दिसते.

# जागतिकीकरणाचे दोष.

## Demerits Of Globalization.

सध्या जागतिकीकरण म्हणजे जगाच्या उत्क्रांतीच्या परमावधी असे मानले जाते. या धोरणाचे अनेक तोटेही दिसून येऊ लागले. विशेषतः प्रगत देशाच्या मानाने विकसनशील देशांना या धोरणाचे अनेक तोटेही सहन करावे लागतात. जागतिकीकरणातून भांडवल, वस्तू व सेवा राष्ट्राच्या भिंती ओलांडून जगभर पसरल्या. पण तंत्रज्ञान मात्र विकसित देशांनी आपल्या ताब्यात ठेवले आहे

## १] रोजगारावरील परिणाम-

जागतिकीकरण परकीय भांडवल व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाने अधिक रोजगार निर्माण करणे अपेक्षित असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. कंपन्यांनी मोठी गुंतवणूक केली, पण ती स्वतःच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी, व्यवस्थापन आणि तंत्रज्ञानाच्या

क्षेत्रात काही तरुणांना उच्च पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत. परंतु देशात त्या रोजगारनिर्मितीच्या एकूण गरजेच्या तुलनेत हे प्रमाण अगदीच अल्प आहे.

## २] शेती क्षेत्रावरील विपरित परिणाम-

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पण जागतिकीकरणाचे या क्षेत्रावर होणारे परिणाम दूरगामी आहेत. सन् 1991 साली जागतिकीकरणाचे वारे सुरु झाले त्यावेळचे गॅटचे सरसंचालक आर्थर डंकेल यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार व शेतीसंबंधी अनेक धोरणे सर्व देशांना सक्तीने स्वीकारण्यास भाग पाडले. याचा विपरीत परिणाम शेतीक्षेत्रावर झाला. अनेक छोटे शेतकरी आत्महत्या करत आहेत.

## ३] आरोग्य सेवेवरील परिणाम-

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यांचे व्यवस्थापन करणे हे शासनाचे प्रमुख काम असते. जागतिकीकरणाच्या नावाखाली या जबाबदाऱ्या टाळण्याकडे प्रवृत्ती वाढू लागली आहे. आरोग्य सेवांचेही खाजगीकरण करून गरीबांच्या आरोग्याची जबाबदारी शासनव्यवस्था झटकून टाकताना दिसत आहे. आरोग्य शिक्षण हा आता नफेखोरीचा व्यवसाय झाला आहे. याचा फटका गरीब मध्यमवर्गाला बसत आहे.

Topic



Date

## 4] कर्जबाजारीपणा वाढला-

सन 1980 नंतर अविकसित देश कर्जबाजारी झाल्याने कर्जाच्या सापळ्यात अडकले. कर्जबाजारीपणाच्या पहिला धक्का लॅटिन अमेरिकेतील मेक्सिकोला बसला. सन 1991 मध्ये भारतातही तीच परिस्थिती ओढवली. वेगवेगळ्या देशाच्या परिस्थितीचा फारसा विचार न करता जागतिकीकरणाने सर्वांना देशांना आर्थिक पुनर्रचनेच्या माध्यमाने जखडून टाकले. याचा परिणाम कर्जबाजारी देश आणखी कर्जबाजारी झाले.

## 5] पर्यावरण हानी-

जागतिकीकरणाने विविध देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास मोठा प्रमाणात होतो. जागतिकीकरणाने विषुववृत्तीय वनसंपदेचा 55% भाग नष्ट झाला. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जैवविविधतेचा नाश होतो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आर्थिक प्रगती साध्य करताना प्रगत देशांना पर्यावरणाची काळजी घेण्याचे भान नसते.

0X0

Scanned with CamScanner

Topic



Date

# आभार.

कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज श्री प्राचार्य डॉ. एल.जी. जाधव सर तसेच यांची आभारी आहोत. सरांनी आम्हाला अभ्यासक्रमात असणाऱ्या विषयाला अनुसरून खूप माहिती समजवली.

आम्हाला पेपर नं. ५ साठी प्रकल्प हा अभ्यासक्रमातील जागतिकीकरण हा विषय आहे. आम्हाला हा विभाग अत्यंत महत्वाचा आहे. या विषयाचे पूर्ण ज्ञान आम्हाला समजले. म्हणूनच या आमच्या गटातील सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने मी गुजर सर व घार्गे सर आणि त्याचबरोबर प्राचार्य सरांची आभारी आहे.

— oXo —

# धन्यवाद.

Scanned with CamScanner